दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २७० | MAHMAR/2006/17212 | रायगड | रविवार, दि.२८ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## तब्बल ३६ कोटींचे हेरॉइन जप्त, नऊ अटकेत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पायधुनी पोलिसांनी मशीद बंदर आणि ओशिवरा येथे कारवाई करून तब्बल ३६ कोटी रुपयांचा हेरॉइन या अमली पदार्थाचा साठा जप्त केला. याप्रकरणी आतापर्यंत सहा पुरुष, तीन महिलांसह नऊ जणांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये विक्रेत्यापासून पुरवठादाराचा समावेश आहे.

पोलिस उपायुक्त विजयकांत सागर आणि वरिष्ठ निरीक्षक, पायधुनी पोलिस ठाणे विनोद गावकर यांच्या मार्गदर्शनाखाली १६ डिसेंबरला निरीक्षक सलीम खान, उपनिरीक्षक सचिन लहामगे, अनिल वायाळ यांच्या पथकाने मशीद बंदरच्या पी. डीमेलो रोड येथून जल-ाराम नटवर ठक्कर आणि वसीम मजरुद्दीन सय्यद या दोन तरुणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे सव्वाकोटी रुपये किंमतीचे हेरॉइन सापडले. विक्रीसाठी आलेल्या दोघांनी हे अमली पदार्थ कुठून आणले याचा पोलिसांनी तपास केला. त्यांच्या चौकशीत रूबीना खान हिचे नाव पुढे आले. तिने चौकशीमध्ये हे अमली पदार्थ शबनम शेख या महिलेने दिल्याचे सांगितले. गायब झालेल्या शबनमला पोलिसांनी राजस्थान येथून शोधून काढले.

# महाड हाणामारी प्रकरणातील ३ आरोपींना अटक ; २९ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी

### मुंबईतील सहारा पोलिसांच्या मदतीने दोघांना विमानतळ परिसरातून अटक

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड नगरपरिषदेच्या झालेल्या निवडणुकीदरम्यान रस्त्यावर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) व शिव-सेना (शिंदे गट) कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या हाणामारी प्रकरणात पोलिसांनी तीन संशयितांना ताब्यात घेतले आहे. २७ डिसेंबर रोजी त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने २९ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली असल्याची माहिती महाड शहर पोलीस सूत्रांकडून देण्यात आली.



संशयित आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक रायगड (अलिबाग) व अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी महाड यांच्या नेतृत्वाखाली दोन विशेष पथके तयार करण्यात आली होती. पहिले पथक मुंबई व ठाणे परिसरात रवाना करण्यात आले होते. तांत्रिक तपास व मोबाईल लोकेशनच्या आधारे प्रतीक प्रताप शिंदे (वय ३३, रा. प्रभात कॉलनी, महाड) आणि प्रतीक नरेश पवार (रा. नागलवाडी, महाड) हे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून मुंबई ते गोवा प्रवास करणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सहारा पोलीस ठाणे, मुंबई यांच्या मदतीने या दोघांना विमानतळ परिसरातून ताब्यात घेऊन महाड शहर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले.

दरम्यान, दुसऱ्या पथकाला मिळालेल्या माहितीनुसार, या गुन्ह्यातील संशयित अमित अशोक कदम (रा. नागलवाडी, महाड) हा त्याच्या राहत्या घरी आल्याचे समजताच पोलिसांनी तात्काळ कारवाई करत त्यालाही ताब्यात घेऊन महाड शहर पोलीस ठाण्यात आणले.

या तिन्ही संशयितांना २७ डिसेंबर २०२५ रोजी अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले असून, न्यायालयाने त्यांना २९ डिसेंबर २०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# घरातील नातेवाईकांनीच केला दागिने चोरीचा आरोप; अल्पवयीन मुलीची आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरातील नातेवाईकांनीच दागिने चोरीचा संशय घेत १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा मानसिक छळ केल्याने या मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना कळंबोली भागात घडली.

कळंबोली पोलिसांनी या घटनेचा तपास करत मृत मुलीचे काका, काकू व चुलत बहिणीविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करत काकाला अटक केली आहे.

या प्रकरणातील तक्रारदार दिनेश यादव (४०) हे कळंबोली सेक्टर-१४ मध्ये एकत्र कुटुंबासह वास्तव्यास आहेत. गेल्या २ सप्टेंबर रोजी यादव कुटुंबीयांच्या गणपतीचे विसर्जन सुरू असताना, काकू सुशीला यादव यांच्या घरातील पाच तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र चोरीस गेले.

या चोरीचा संशय दिनेश यादव यांची १७ वर्षीय मुलगी मानसीवर घेण्यात आला होता. त्यामुळे काका रमेश यादव यांनी मानसीला आपल्या घरी बोलावून दागिने चोरीच्या संशयावरून तिला जाब विचारला होता. तसेच काकू व चुलत बहिणीने तिच्या चारित्र्यावर संशय घेत अत्यंत अपमानास्पद आरोप तिच्यावर केले होते.


त्यानंतर रमेश यादव यांनी आपल्या पुतणीविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर मानसीला जबरदस्तीने कळंबोली पोलीस ठाण्यात नेण्यात आले होते तसेच मानसी व तिच्या मित्राविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

हा अपमान सहन न झाल्याने मानसीने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली. तिला तत्काळ कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात नेण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तिला दाखलपूर्व मृत घोषित केले. या प्रकरणाचा कळंबोली पोलिसांनी तपास करत रमेश यादव (६३), त्यांची पत्नी सुशीला यादव व मुलगी करिश्मा यादव या तिघांविरोधात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर आता रमेश यादव यांना अटक करण्यात आली आहे.

# पेण-खारपाडा परिसरात रेल्वेच्या धडकेने बिबट्याचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यात सध्या बिबट्या मानवी वसाहतीत येत असल्याने दहशतीचे वातावरण असतानाच, खारपाडा दुष्मी परिसरात एका बिबट्याचा रेल्वेच्या जोरदार धडकेत मृत्यू झाल्याची घटना घडली. शनिवारी सकाळी खारपाडा-सावरोली रस्त्यालगत असलेल्या रेल्वे रुळांजवळ बिबट्या मृतावस्थेत आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.



दरम्यान, खारपाडा दुष्मी हा जंगलालगतचा परिसर असून बाजूला खाडी आहे. वन विभाग व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे ,पेन प्रशासन जंगल असलेले डोंगर बिल्डरच्या घशात घालत असल्यामुळे पेण तालुक्यात असलेले वन्यप्राणी शहरात खाद्यपदार्थासाठी येत असून त्याचाच एक भाग म्हणून आज बिबट्या त्याच्या शिकार झाला असून त्याचा बिबट्याचा रेल्वेच्या धडकेने मृत्यू झाला याला जबाबदार पेनचे प्रशासकच असल्याचे चर्चा पेण तालुक्यात सुरू आहे. जंगलातील वन्यजीव पाणी व शिकार शोधण्यासाठी अनेकदा खाडीच्या दिशेने ये-जा करतात. शनिवारी सकाळी असाच एक बिबट्या रेल्वे मार्ग ओलांडत असताना धावत्या रेल्वेची त्याला जोरदार धडक बसली असावी व त्यातच त्याचा मृत्यू झाला असावा असा अंदाज स्थानिक ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी पोलिस प्रशासन व वन विभागाशी संपर्क साधला. वन विभागाचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून मृत बिबट्याचा पंचनामा करून पुढील कार्यवाही करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे

## लिव्ह-इन जोडीदाराचा महिलेसह तिच्या मुलीवर हल्ला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या एका व्यक्तीने चारित्र्याच्या संशयातून जोडीदार महिलेसह तिच्या मुलीवर चाकूने सपासप वार करून दोघींना जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना पनवेलच्या आदई गावात घडली.

या घटनेनंतर खांदेश्वर पोलिसांनी आरोपी रितेश सिंग विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

रितेश सिंग हा गेल्या चार वर्षांपासून सोनम जांगीड (४२) या महिलेसोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये पनवेलमधील आदई गाव येथील गायत्री इंद्रप्रस्थ इमारत राहत होता.

रितेश सिंग याला सोनमच्या चारित्र्यावर संशय घेत होता. त्यातून त्याने दोघी झोपल्या असताना त्यांच्यावर चाकून वार करुन त्यांना जखमी करुन स्वतःला जखमी केले.

### रोडपालीत शेकापला जोरदार झटका...

# अनेक कार्यकर्त्यांचा समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रोडपालीत शेतकरी कामगार पक्षाला मोठा राजकीय धक्का बसला आहे. शेकापचे अनेक प्रमुख कार्यकर्ते व त्यांच्या समर्थकांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिका निवडणूक प्रमुख आमदार महेश बालदी, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते प्रवेशकर्त्यांचे स्वागत करण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देश व राज्यात आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू आहेत. त्या विकास प्रवाहात सहभागी होण्यासाठी अनेक कार्यकर्ते भाजपमध्ये येत आहेत. त्यानुसार रोडपालीतील कार्यकर्ते भाजपमध्ये सहभागी झाले. शेकापक्षातून दत्ता पगडे, अमर कान्हा भगत, प्रशांत सुरेश पाटील, रोशन नारायण भोईर, सूरज जनार्दन पाटील, अरविंद गोकुळ भोईर, प्रणय गोकुळ भोईर, राजेश नारायण भोईर, प्रविण म्हात्रे, आयुष हरिचंद्र पाटील, अमित कान्हा भगत, हेमंत धनंजय म्हात्रे, सचिन जनार्दन पाटील, अक्षय कान्हा भगत, मितेश गुरुनाथ पाटील, चेतन अशोक ठाकूर, हृतिक रोहिदास भोईर यांनी त्यांच्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

यावेळी भाजपचे कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील, माजी नगरसेवक संतोष शर्मा, महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर, जेष्ठ नेते अरुण पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

### पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५

# निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेची निवडणूक पारदर्शक, निष्पक्ष व सुरळीतपणे पार पाडावी यासाठी निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देण्यात येणार आहे, पनवेल महानगरपालिकेतील २० प्रभागनिहाय क्षेत्राकरीता ६६० मतदान केंद्र आहे. सदर केंद्राकरीता ६ निवडणूक निर्णय अधिकारी (RO), ६८ क्षेत्रीय अधिकारी (ZO) तसेच मतदान केंद्राध्यक्ष (PRO), सहाय्यक मतदान अधिकारी (PO-१,२,३) शिपाई आणि ६५ राखीव मतदान केंद्राकरीता सुसज्ज असे एकूण ७२५ पथके गठीत करण्यात आले आहे.

पनवेल महानगरपालिका निवडणूक प्रक्रियेत सहभागी अशा एकूण ४२०५ अधिकरी व कर्मचाऱ्यांकरीता २९ डिसेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृह, पनवेल या ठिकाणी प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत विविध टप्यांमध्ये प्रशिक्षण राबविले जाणार आहे.

प्रशिक्षणामध्ये निवडणूक प्रक्रियेतील जबाबदाऱ्या, आचारसंहिता, मतदान व मतमोजणी प्रक्रिया, कायदेशीरबाबी, ई.व्ही.एम. मशीन प्रत्यक्ष हाताळणी तसेच आपत्कालीन परिस्थितीत करावयाची कार्यवाही याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. निवडणूक प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे कोणतीही त्रुटी, गोंधळ किंवा गैरप्रकार टाळून निवडणूक प्रक्रिया विश्वासार्ह व पारदर्शक ठेवणे हा आहे.

प्रशिक्षणाची तारीख, वेळ व ठिकाण याची माहिती संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वतंत्रपणे कळविण्यात आली आहे.

सदर प्रशिक्षणाकरीता पनवेल महानगरपालिकेमार्फत सर्व पूर्व तयारी करण्यात आलेली आहे. या प्रशिक्षणास उपस्थित राहणे अधिकारी, कर्मचारी यांना बंधनकारक आहे.

प्रशिक्षणात अनुपस्थित राहणाऱ्या किंवा आदेशांचे पालन न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा सक्त इशारा निवडणूक अधिकारी तथा पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे यांच्या वतीने देण्यात आला आहे.



### गहाळ झालेले १५ लाख ४५ हजार रूपये किंमतीचे...

# १०३ मोबाईल पनवेल शहर पोलिसांनी मुळ मालकांना केले परत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात मागील काही दिवसाप-ासुन नागरीकांचे गहाळ झालेल्या मोबाईलचा तांत्रिकदृष्टया सीईआयआर प्रणालीच्या माध्यमातुन शोध घेवुन गहाळ मोबाईल पैकी १५ लाख ४५ हजार रूपये किंमतीचे १०३ मोबाईल शोधण्यात पनवेल शहर पोलीस ठाणे सीईआयर प्रणाली पथक यांना यश आले आहे. सदर शोधण्यात आलेले मोबाईल आज सहा. पोलीस आयुक्त भाउसाहेब ढोले,यांच्या हस्ते नागरीकांना परत देण्यात आले.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, पोलीस सहआयुक्त संजय येनपुरे, पोलीस उप आयुक्त प्रशांत मोहीत, सहा. पोलीस आयुक्त भाउसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शाकिर पटेल, पोलीस निरीक्षक (प्रशासन) अभिजीत अभंग यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक प्रविण फडतरे, पोशि विशाल दुधे, सचिन कोर, पोहवा अमोल पाटील, संदेश म्हात्रे, तुषार बोरसे, पोना मिथुन भोसले, पोशि किरण कराड, पोलीस नाईक अभय सांगळे, पोलीस शिपाई प्रविण पाटील यांनी उत्कृष्ट कारवाई केली आहे.

यावेळी मोबाईल परत मिळाल्याने मोबाईलच्या मूळ मालकांनी आनंद व्यक्त करत पनवेल शहर पोलिसांचे आभार मानले.

# कुऱ्हाड – झाडांवर, निष्ठेवरही!

भाजपचे सर्वप्रिय नेतृत्व म्हणवल्या जाणाऱ्या स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीदिनीच नाशिकमध्ये भाजपने तत्वनिष्ठेचे बोचके गोदावरीच्या पाण्यात भिरकावले. सत्तेच्या मदांधतेत आणि विजयाच्या कैफात स्वपक्षीय निष्ठावंत कार्यकर्त्यांना, तसेच मतदारांनाही गृहीत धरण्याचे पातक भाजपचे संकटमोचक म्हणवल्या जाणाऱ्या गिरीश महाजन यांच्याकडून घडले. निष्ठावंत कार्यकर्त्यांनी संतापून महाजनांना धारेवर धरले, तरी कशाकशाला न जुमानता त्यांनी विरोधातील सर्वपक्षीय स्थानिक नेत्यांना पावन करून भाजपमध्ये घेतलेच. महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सध्या सगळीकडेच जोडाजोडी आणि फोडाफोडीच्या राजकारणाला वेग आला असला, तरी भाजपने नाशिकमध्ये जे केले ते क्लेशदायीच नव्हे, तर संतापजनकही ठरते. विरोधी आघाडीतील काँग्रेस, उद्धवसेना, मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या चार पक्षांमधील दोन माजी महापौर, स्थायी समितीचे दोन माजी सभापती, एक माजी आमदार व अन्य माजी नगरसेवक अशांचा घाऊक पक्ष-प्रवेश घडवण्यात आला. भाजपच्या नाशिक निवडणूक प्रमुख आमदार देवयानी फरांदे यांच्यासह बहुतांश नेत्यांना अंधारात ठेवून हा प्रवेश सोहळा एका रात्रीत ठरवला गेला. भाजपच्या निष्ठावंत निवडणूक इच्छुकांमध्ये, तसेच स्थानिक नेत्या-कार्यकर्त्यांमध्ये कमालीची अस्वस्थता पसरली. फरांदे यांच्यासह बरेच निष्ठावंत नेते-कार्यकर्ते संतापून रस्त्यावर उतरले. गिरीश महाजन यांना भाजप कार्यालयाबाहेरच घेराव घालून कार्यकर्ते जाब विचारताहेत, असे अभूतपूर्व चित्र पाहावयास मिळाले. कार्यकर्त्यांचा विरोध इतका तीव्र होता की, नव्याने पक्षात येणाऱ्यांना पोलिस बंदोबस्तात आणि चक्क मागच्या दरवाजाने भाजप कार्यालयात आणावे लागले. हा सगळा विरोध अक्षरश: फाट्यावर मारत महाजनांनी वादग्रस्त पार्श्वभूमी असलेल्या आयारामांच्या गळ्यात कमळ चिन्हाची उपरणी घातलीच ! काँग्रेसचे शाहू खैरे यांचा अपवाद वगळता इतर साऱ्यांनी आपापल्या स्वार्थासाठी किमान तीन-चार पक्षांतरे केली आहेत. विधानसभा निवडणुकीत तिकीट न मिळाल्याने भाजपचा त्याग करून मनसेत जावून निवडणूक लढलेले आणि त्यानंतर मनसेचे प्रदेश सरचिटणीस बनलेले दिनकर पाटील तसेच उद्धवसेनेचे नेते, माजी महापौर विनायक पांडे हे दोघे तर आदल्याच दिवशी ठाकरे बंधू एकत्र आल्याबद्दल एकमेकांना पेढे भरवत ढोल-ताशांच्या गजरात रस्त्यावर नाचले होते. चोवीस तासांत हे दोघे बिनदिक्कतपणे भाजपमध्ये दाखल झाले. हे असे आपण का केले, याचे कसलेही गुळमुळीत खुलासे न देता 'आपण पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी भाजपत येत आहोत', असे अगदी रोखठोक उत्तर उभयतांनी माध्यमांसमोर दिले. माजी आमदार नितीन भोसले आणि माजी महापौर यतिन वाघ हे देखील राजकीय सोयीसाठीच भाजपच्या वळचणीला आले आहेत. भाजपने सुद्धा विरोधी आघाडीतील सक्षम नेत्यांना आणि प्रस्थापितांना आपल्याकडे खेचून विरोधक शिल्लकच ठेवायचे नाहीत, असा गुजरात पॅटर्न नाशिकमध्ये राबविला. गिरीश महाजन या प्रयोगाचे कर्तेधर्ते आणि त्यांचाही याबद्दल एक जळगाव पॅटर्न आहेच. त्यामुळे निष्ठावंतांचा वर्ग कमालीचा दुखावला गेला आहे. तसेही नाशिक अपवाद नाही. चंद्रपूर म्हणजे चांद्यापासून बांद्यापर्यंत 'आतले विरुद्ध बाहेरचे' असा वाद भाजपमध्ये उफाळला आहे. ही घाऊक भरती म्हणजे वास्तवात बाळसे नसून, सूज आहे. संधीसाधू राजकारणासाठी भाजपला आपलेसे करणाऱ्या मंडळींच्या निष्ठा एवढ्या निसरड्या असतात की, वेळ येताच भाजपला टांग देण्यास ही मंडळी जराही मागेपुढे पाहणार नाहीत. पण, सत्तातूर भाजपला त्याची काहीही फिकीर नाही. नाशकात गिरीश महाजनांनी ज्या आविर्भावात हे सारे केले, त्यातून पक्ष कार्यकर्त्यांसह लोकांना गृहीत धरण्याची मनोवृत्ती आणि सत्तेचा मद उघडपणे पाझरताना दिसतो. निवडणूक जिंकण्याची झिंग चढलेला भाजप त्या नादात जरी निष्ठा, नैतिकता याकडे डोळेझाक करत असला, तरी सामान्य मतदार उघड्या डोळ्याने हे सारे पाहतो आहे. वेळ येताच आणि समोर जरा बरा पर्याय दिसताच सत्तेची धुंदी उतरवायला मतदार मागेपुढे पाहणार नाही. महाजनांची दांडगाई केवळ पक्षप्रवेशावेळीच दिसली असे नाही. आधी तपोवनातील अठराशे झाडे तोडण्याच्या मुद्द्यावर अशीच मुजोरी महाजनांनी दाखविली. परिणामी, सरकारवर प्रचंड टीका झाली. नाशिककर रस्त्यावर उतरले. त्यातून धडा शिकण्याऐवजी महाजनांनी आता थेट आपल्याच पक्षाचे कार्यकर्ते अंगावर घेतले आहेत. झाडांवर कुऱ्हाड उगारलीच, तशी निष्ठेवरही ! संकटमोचक कसले, ते पक्ष व सरकारपुढे एकामागून रोज नवे संकट उभे करीत आहेत. त्याचा परिणाम लगेच दिसला नाही, तरी कधी ना कधी दिसेलच.



दै.रायगड नगरीचे संपादक राकेश पितळे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना रवींद्र पाटील सोबत पत्रकार संजय कदम उपस्थित होते.

# रोपट्याचे रुपांतर वटवृक्षात ; जन्मबंध व्हाट्सएप ग्रुपची प्रेरणादायी आणि ऐतिहासिक वाटचाल

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जन्मबंध फाउंडेशनच्या पुढाकारातून सुरू झालेल्या जन्मबंध व्हाट्सएप ग्रुप या उपक्रमाने सुवर्णकार समाजासाठी एक आदर्श निर्माण केला आहे. केवळ व्हाट्सएप या डिजिटल माध्यमाच्या सहाय्याने समाजातील विविध शाखांमधील ७,०००हून अधिक मुला-मुलींची विवाह जुळवणी पूर्णतः विनामूल्य करण्यात आली असून, यासाठी कोणाकडूनही कोणताही मोबदला स्वीकारण्यात आलेला नाही.

सन २०१२ मध्ये मुंबई येथे झालेल्या वर-वधू परिचय मेळाव्यानंतर समाजोपयोगी, दीर्घकालीन उपक्रमाची संकल्पना आकाराला आली. त्यानंतर सन २०१३ मध्ये जन्मबंध व्हाट्सएप ग्रुपची औपचारिक स्थापना करण्यात आली. सुरुवातीला शंका व्यक्त झाल्या असल्या तरी, समाजातील मान्यवरांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी ठरला. आजच्या धकाधकीच्या जीवनात लग्न जुळवणीसाठी लागणारा आर्थिक व मानसिक ताण कमी करण्यासाठी जन्मबंधने डिजिटल माध्यमाचा सकारात्मक वापर केला. घरबसल्या, पारदर्शक व सुलभ पद्धतीने अपेक्षित वर-वधूंची माहिती उपलब्ध करून देण्याचे कार्य प्रभावीपणे सुरू आहे. आजवर मुंबई, पुणे, नाशिक, धुळे, सटाणा, बदलापूर, उज्जैन, छत्रपती संभाजीनगर, बडोदा, इंदूर आदी ठिकाणी १८ विनामूल्य वर-वधू परिचय मेळावे यशस्वीरीत्या पार पडले असून, त्यामुळे समाजाचा कोट्यवधी रुपयांचा खर्च वाचला आहे. विधुर, विधवा व अपंग व्यक्तींनाही योग्य जोडीदार मिळवून देण्यात जन्मबंधने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

जन्मबंध फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर मोरे यांच्या नेतृत्वाखाली अनेक निःस्वार्थ समाज बांधवांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम वटवृक्षात रूपांतरित झाला आहे. दिवंगत सह काऱ्यांच्या योगदाना बद्दल यावेळी कृतज्ञता पूर्वक स्मरण करण्यात आले.

# ८४ हजाराची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डेबिट कार्ड द्वारे ८४ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

शशिकांत सोनवणे हे सेवानिवृत्त असून खांदा कॉलनीत राहतात. ते बँकेच्या एटीएम सेंटरमध्ये रक्कम काढण्यासाठी गेले. त्यांनी एटीएम मशीनमध्ये टाकून पासवर्ड टाकला. मात्र रक्कम आली नाही. यावेळी सेंटरच्या बाहेर उभा असणारा एक इसम एटीएम सेंटरमध्ये आला आणि तुमचे पैसे निघत नाहीत का तुम्ही दुसरे कार्ड टाका असे बोलला.

यावेळी सोनवणे यांनी दुसरे डेबिट कार्ड एटीएम मशीनमध्ये टाकून पासवर्ड टाकला. तरी देखील पैसे आले नाहीत. यावेळी त्या इसमाने तुमची स्लिप खाली पडली असे सांगितले. त्यांनी स्लिप उचलली आणि डेबिट कार्ड घेऊन घरी आले.

रात्रीच्या सुमारास त्यांना त्यांच्या बँक खात्यातून ८४ हजार रुपये वजा झाल्याचे मेसेज आला. अनोळखी इसमाने स्लिप खाली पडली असे सांगून स्लीप उचलण्यासाठी सोनवणे वाकले असता हातचलाखिने त्याच्याकडील डेबिट कार्ड सोनवणे यांना देऊन त्यांचे कार्ड तो घेऊन गेला आणि त्याद्वारे ८४ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे त्यांच्या लक्षात आले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि सौ. क्षमा संजय ओसवाल यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४९ | ०-७३-०० | ०.१८ |
| ५४/२ | ०-६०-०० | ०.१० |
| ८१ | ०-१८-०० | ०.२४ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, कराराननामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील सौ. क्षमा संजय ओसवाल यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : २८/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे भेरले, ता. पनवेल, जि. रायगड येथील मुळ मालक / भोगवटाधारक श्री. धनाजी धर्मा पाटील आणि श्री. रामदास धर्मा पाटील यांचे हिश्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जिरायत जमीन आमचे अशिलांनी त्यांच्याकडुन कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापुर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक /भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरीता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन : मौजे भेरले, ता. पनवेल, जि. रायगड**

| खाते क्रमांक | भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. /गट नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १६१ | धनाजी धर्मा पाटील<br>रामदास धर्मा पाटील | १३४ | ०-३९-००<br>पो.ख. ०-१८-७०<br>एकूण क्षेत्र ०-५९-७० | १.८१ |

तरी वर नमुद जमीनीवर / मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासहित खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबतचा जमीन मालक श्री. धनाजी धर्मा पाटील आणि श्री. रामदास धर्मा पाटील यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहित असल्याबाबत गृहित धरुन त्याप्रमाणे सदरहु मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमीनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडुन दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २६/१२/२०२५

सही/-
**ॲड. विशाल कोंडिबा व्हनमाने**
**ऑफिस नं. १२०१, वि-टाइम्स स्केअर,**
**भूखंड क्रं. ३, सेक्टर नं. १५, सीबीडी**
**बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**
**मो. नं. ८२८६६५१७४७**

## ग्रामपंचायत आकुर्ली
## ता.पनवेल,जि.रायगड

जा.क्र.३४०/(ग्रा.पं./आस्था २०२५)
दि.२६/१२/२०२५

प्रती,

याव्दारे जाहीर करण्यात येते कि खालील तपशिलाचे ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी नोंद वहीतील नावात बदल करण्याबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असुन त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत
(वाचा : मुंबई ग्रामपंचायत अधिनियम ८ नियम ३२(१))

| अ. क्र | भाग क्र | स.न /प्रॉ.नं /फा. प्लॉट/सदनिका/गाळा नं | जुने नाव | नविन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | | ओमकार रॉयल सोसायटी आकुर्ली ३९६/H/१०४ | मिनाक्षी मिलिंद सुबंध<br>मिलिंद रमेश सुबंध | ह्रितिक किशोर पराते<br>प्रिया किशोर पराते |
| २ | | शिकारा ऑर्किड सोसायटी आकुर्ली ४३३/1/C//३०१ | शिकारा कंन्ट्रक्शन प्रा.लि तर्फे मॅनेजींग डायरेक्टर अशोक मेहरा | मिलिंद नारायण ताडकर<br>अक्षता नारायण ताडकर |
| ३ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/F/१८०५ | जयप्रकाश मथुराप्रसाद बन्सल<br>रविंद्र एम जाजोदिया | राजेशकुमार लक्ष्मी चौधरी<br>निशा राजेश चौधरी |
| ४ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/F/१२०३ | श्वेता सुधीर पाटील<br>सुधीर रामभाऊ पाटील | संगिता बजाभाऊ चालक / बजाभाऊ निवृत्ती चालक/नचीकेत बजाभाऊ चालक |
| ५ | | बलाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/F/९०१ | दर्शना एम देसाई<br>संजय एम देसाई | तसलीम आरीफ मुनीर अत्तार<br>रेश्मा तसलीम अत्तार |
| ६ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/A/२३०३ | अमित तुलसीराम गुप्ता<br>शिप्रा अमित गुप्ता | हेमंत कुमार पाठक<br>गीता पाठक |
| ७ | | साई अंगण सोसायटी आकुर्ली ४१६/A/२०४ | अभय भाऊराव म्हामुणकर | रघुविर मारूती कोडगुंटे / अनुराधा रघुविर कोडगुंटे / नंदिनी रघुविर काडगुंटे |
| ८ | | जय मल्हार सोसायटी आकुर्ली ४१४/२०५ | मे वैष्णवी डेव्हलपर्स तर्फे श्री गुरलिंग गणपती वाले | शिवाजी बाबसाहेब भोगाडे<br>राणी शिवाजी भोगाडे |
| ९ | | पनवेल पॅराडाईज सोसायटी आकुर्ली ३६०/A/३०२ | अंकिता अशोक शिवलकर<br>अर्चना अशोक शिवलकर | सुप्रिया सुनिल भोसले<br>सुनिल शंकर भोसले |
| १० | | अपेक्षा कॉम्प्लेक्स आकुर्ली २०७ब/K/२०५ | सुनिल वासुदेव काराणे | अक्षता राजू खेडेकर<br>राजू पांडुरंग खेडेकर |
| ११ | | बॅलमॅक रिव्हरसाईट ३ आकुर्ली ४३२/B/२०२ | सुप्रिम होल्डिंग्स ॲड हॉस्पिटॅलिटी (इंडिया) लिमिटेड तर्फे डी विदिप जेटीया | कविता अनिल गोपाळ<br>गिरीश रविकांत गुमास्ते |
| १२ | | गायत्री व्हिजन सोसायटी आकुर्ली ३१६/A/०३ | दत्तात्रेय शहाजी खुणे | महेंद्र लक्ष्मणराव राऊत<br>सुचिता महेंद्र राऊत |
| १३ | | ३९ | संजय कुष्णा भोपी<br>सागर कुष्णा भोपी | भारती सचिन पाटील |
| १४ | | तुलसी विहार सोसायटी आकुर्ली १९४/A/१०१ | वासुदेव मानसिंग चव्हाण<br>वैशाली गुणवंतराव चव्हाण | गुणवंतराव मानसिंग चव्हाण<br>वैशाली गुणवंतराव चव्हाण |
| १५ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C-3/००२ | मातेश्वरी हौसिंग एलएलपी तर्फे भागीदार परेश बाबूलाल पटेल | सायली बबन पाटील<br>शारदा बबन पाटील |
| १६ | | २३९/ब | संदिप लक्ष्मण पाटील | उत्कर्षा नितीन भोपी |
| १७ | | सकासी पार्क ३ आकुर्ली ४१९/2-A//३०१ | सिध्देश प्रदिप राऊत | रमेशकुमार लुम्बारामजी चौधरी<br>दाकु रमेशकुमार चौधरी |
| १८ | | कपालेश्वर आपारमेन्ट आकुर्ली ३७९/१०१ | मे.जी.के बिल्डर्स आणि डेव्हलपर्स तर्फे पार्टनर श्री शिवदास पदु म्हात्रे | मंगेश शांताराम कदम<br>प्रणाली मंगेश कदम |
| १९ | | राम निवास आकुर्ली ७९/०१ | में.आश्रय कंन्ट्रक्शन तर्फे प्रो.प्रा आनंद पी सालियन / महेंद्र मंगळया म्हात्रे | पवनकुमार रघु निर्मल<br>विजयाकुमारी पवनकुमार निर्मल |
| २० | | राम निवास आकुर्ली ७९/२०१ | में.आश्रय कंन्ट्रक्शन तर्फे प्रो.प्रा आनंद पी सालियन / महेंद्र मंगळया म्हात्रे | ब्रीजराज डी गौतमी<br>शशिकला बी गौतमी |
| २१ | | राम निवास आकुर्ली ७९/३०२ | में.आश्रय कंन्ट्रक्शन तर्फे प्रो.प्रा आनंद पी सालियन / महेंद्र मंगळया म्हात्रे | राजु रामदुलारे गोड |
| २२ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/A/२४०२ | सिध्दांत मिलिंद चव्हाण<br>मिलिंद गजानन चव्हाण | सेबॅस्टीयन विन्सेंट थैकाडन<br>जिनीया जॉर्ज |
| २३ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/A/२९०३ | वर्गीस डॅनियल | वैभव अनिलराव लव्हाळे<br>मनिषा वैभव लव्हाळे |
| २४ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/A/२७०२ | नंदिनी वासुदेव बडे<br>वासुदेव गंगाराम बडे | अजित कुमार सहदेव राम<br>अनिता अजित कुमार |
| २५ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/H/२७०४ | मांगीबाई गिरधारीलाल चौधरी<br>गिरधारीलाल भानाजी चौधरी | प्रगती सचिन फाळके<br>सचिन शिवाजी फाळके |
| २६ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/ H/७०६ | मो.गुफरान मोहम्मद इरफान अन्सारी | भावना मोहनसिंग रावत |
| २७ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/ G/२९०६ | चंदरपाल लखानी | सचिन कुमार |

वरील बाबत प्रकरण परत्वे आवश्यकतेनुसार ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्याच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधीन असुन या बाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिध्दीचे दिनांकापासून सात दिवसाचे आत ग्रामपंचायत आकुर्ली कार्यालयात लेखी स्वरूपात दाखल करावी.वरील प्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे बदत करणेत आलेनंतर प्राप्त होणा—या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरण मुबंई ग्रामपंचायत अधिनियम प्रकरण ८ नियम ३२(१) नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल यांची कुपया नोंद घ्यावी.

सौ.भारती सचिन पाटील
सरपंच
ग्रामपंचायत आकुर्ली

श्री.जयेंद्र घनशाम म्हात्रे
ग्रामसेवक
ग्रामपंचायत आकुर्ली

# तरुण बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक तरुण कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

विश्वास कमल शर्मा (१८ वर्षे ९ महिने) हा वाकडी येथे राहणारा असून तो कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेला आहे. शरीर बांधाने मजबूत, उंची ५ फुट ६ इंच, रंग गोरा, डोक्याचे केस काळे, डोळे काळे, नाक सरळ, चेहरा गोल, दाढी मिशी नाही, अंगात सफेद रंगाचा टी-शर्ट व लाईट ब्ल्यू कलर व ब्लॅक कलरची जिन्स पॅन्ट, पायात पांढर्या रंगाचे बुट असून त्याला इंग्रजी, हिंदी व मराठी भाषा अवगत आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा पो.हवा.धनाजी तांडेल यांच्याशी संपर्क साधावा.

**दै.रायगड नगरी**
**बातम्या व जाहिरातींचे उत्तम माध्यम**
**संपर्क :**
**९६१९९७९७०६ / ९६१९७३७९११**

## PUBLIC NOTICE

TAKE NOTICE THAT our client Ashish Kumar Sodai is intending to purchase the immovable property situated at village Bagmandla Taluka-Shrivardhan, Dist-Raigad. described in the Schedule hereunder written free from all encumbrances. Any person having any claim or right in respect of the said property by way of inheritance, share, sale, mortgage, lease, lien, license, gift, possession, possession of original title deeds or encumbrance howsoever or otherwise is hereby required to intimate to the undersigned within 11 days from the date of publication of this notice of his such claim, if any, with all supporting documents failing which the transaction shall be completed without reference to such claim and the claims, if any, of such person shall be treated as waived and not binding on our clients.

**THE SCHEDULE OF THE PROPERTY**

| S.No. H.No. | Area H.R.Sq.mtrs | Assessment Rs. Ps. | Type | Owner |
|---|---|---|---|---|
| 572 | 1.24.00 | 0.60 | Agricultural | Nathuram Pandu Pendhari & Other 5 |
| 341 | 0.59.00 | 0.22 | Agricultural | Shabiyabibi Dawoot Kondvilkar & Other 10 |
| 529 | 0.20.00 | 0.06 | Agricultural | Mukesh Parshuram Katkar |
| 526 | 0.20.00 | 0.07 | Agricultural | Tukaram Ragho Pendhari & Other 15 |
| 576 | 0.49.00 | 0.25 | Agricultural | Shamsuddin A. Gani Saldulkar |
| 528 | 0.65.00 | 0.25 | Agricultural | Darshana Darshrath Wagh |
| 523 | 0.20.00 | 0.09 | Agricultural | Milind Vasant Kulkarni |
| 581 | 0.03.00 | 0.03 | Agricultural | Kisan Gopal Mayekar & 12 |
| 582 | 0.02.00 | 0.02 | Agricultural | Shevanti Dashrath Adavde & 9 |
| 573 | 0.69.60 | 0.53 | Agricultural | Vasant Tukaram Pendhari & 5 |
| 579 | 0.20.00 | 0.09 | Agricultural | Devnath Hari Gandhi |
| 577 | 0.12.00 | 0.06 | Agricultural | Savita Parshuram Katkar & Other 10 |
| 576 | 0.49.00 | 0.25 | Agricultural | Shamsuddin A. Gani Saldulkar |
| 580 | 0.33.50 | 0.16 | Agricultural | Nitin Sharad Vaidya |

Palce : Mahad
Dated : 26/12/2025

SD/-
**SWARAJ A KAREKAR**
**Advocate**
**Off.Address- Shop No. 1 Kusumsugandh Building, Court Ali, Mahad. Mo. 9145115558**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# अवजड वाहनांना बंदी करा : सुरेश घरत



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

सध्या पर्यटनाचा हंगाम सुरु आहे. थर्टीफर्स्टनिमित्त पर्यटक जिल्ह्यात विशेष करून अलिबाग तालुक्यात दाखल झाले आहेत. वाहतूक कोंडीपासून बचाव करण्यासाठी या कालावधीत पुढील दोन दिवस म्हणजे ३१ डिसेंबरपर्यंत अवजड वाहनांना बंदी करण्यात यावी, अशी मागणी शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी केली आहे.

अलिबाग हे पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठिकाण आहे. अलिबाग, वरसोली, किहीम, आक्षी, नागाव, रेवदंडा अशा अनेक पर्यटनस्थळी पर्यटकांची थर्टीफर्स्टला गर्दी होते. यावर्षी देखील पर्यटकांची अलिबागमध्ये येण्याची लगबग सुरु झाली आहे. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी लाखो पर्यटक अलिबागमध्ये दाखल होत आहेत. दरमयान, खराब रस्त्यांमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न भेडसावत असताना अवजड वाहनांमुळेदेखील वाहतूक कोंडीला सामोरे जाण्याची वेळ पर्यटकांवर येण्याची शक्यता आहे. पर्यटनावर आधारित व्यवसायांवर त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पर्यटकांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा, यासाठी पुढील दोन दिवस ३१ डिसेंबरपर्यंत अवजड वाहनांना बंदी करण्यात यावी, अशी मागणी सुरेश घरत यांनी केली आहे.

# आगरदांडा येथे आयुष हॉस्पिटलतर्फे आरोग्य शिबीर : नागरिकांनी घेतला लाभ

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील आयुष हॉस्पिटलतर्फे आगरदांडा ग्रामपंचायतीत सरपंच आशिष हेदुलकर यांच्या सहका-यातून मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले.

यावेळी आयुष हॉस्पिटलचे मेडिकल डायरेक्टर बालरोग तज्ज्ञ डॉ.अनिल गोस्वामी, दंततज्ञ डॉ.डायना, डॉ.सिद्धांत पाटील, डॉ. गीतांजली गरिमा आणि त्यांच्या टीमने आगरदांडा व आजुबाजूच्या परिसरातील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी यामध्ये स्त्री रोग तज्ञ, बालरोग तज्ञ, दंत रोग तज्ञ आणि जनरल फिजिशियन तपासणी करण्यात येऊन मोफत औषधे देण्यात आली.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि सौ. गिता प्रकाश पालरेचा यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ५१ | ०-३०-०० | ०.०७ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील सौ. गिता प्रकाश पालरेचा यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : २८/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि श्री. जिवन झवेरचंद धोका आणि सौ. निता जिवन धोका यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकती त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहेत.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ५० | २-८४-०० | ०.५५ |
| ९४ | ०-१८-०० | ०.०० |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील श्री. जिवन झवेरचंद धोका आणि सौ. निता जिवन धोका यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : २८/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

# १०० फूट दरीत कोसळलेल्या कारमधून बालकाचा ११२ ला फोन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

गेल्या वर्षभरापासून आंबेनळी घाटामध्ये रस्तादुरूस्तीच्या कामामुळे रस्त्याची दैना झाली असून रस्त्याची परिस्थिती गंभीर केल्यामुळे ठेकेदार कंपनीवर कारवाई होत नाही उलट रस्त्याच्या अवस्थेकडे दूर्लक्ष करून अपघातास कारणीभूत ठरल्याचा गुन्हा दाखल होण्याच्या शक्यतेमुळे वाहनचालक हैराण झाल्याचे दिसून आले आहे. गुरूवारी सकाळी आंबेनळी घाटात सकाळच्या सुमारास टाटा नेक्सन कार सुमारे १०० फूट खोल दरीत कोसळली. सुदैवाने कारमधील बालकाने ११२ नंबरला फोन लावल्याने रेस्क्यू ऑपरेशन करण्यात येऊन सर्वांचे जीव वाचविण्यात यश आले आहे.

आंबेनळी घाटातील वळणदार रस्ता आणि तीव्र उताराच्या भागात टाटा निक्सन कारचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार दरीत कोसळली. या अपघातानंतर कारमध्येच असलेल्या दहा वर्षीय मुलाने प्रसंगावधान राखत ११२ या आपत्कालीन क्रमांकावर फोन करून अपघाताची माहिती दिली. फोनवर लहान मुलाचा आवाज असल्याने सुरुवातीला अपघात सहलीच्या बसचा झाल्याची शंका निर्माण झाली. अपघाताचे नेमके ठिकाण स्पष्ट न समजल्यामुळे शोधकार्याला उशीर होऊ लागला आणि रेस्क्यूची सुरूवातच अपघातस्थळ शोधण्यापासूनच करावी लागली. त्यामुळे बस दरीमध्ये कोसळल्याच्या कोणत्याही खुणा न दिसल्याने कारच्या टायरच्या खुणांवरून घटनास्थळ निश्चित झाल्यानंतर बचावकार्य वेगाने सुरू करण्यात आले.

अपघाताची माहिती मिळताच प्रतापगड सर्च एँड रेस्क्यू टीम आणि महाबळेश्वर ट्रेकर्स तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. खोल दरी, घनदाट जंगल आणि अत्यंत अवघड भौगोलिक परिस्थिती असूनही रेस्क्यू पथकांनी दोरखंड, सुरक्षा साधने आणि अन्य आवश्यक उपकरणांच्या सहाय्याने युध्दपातळीवर बचावकार्य राबवले. अपघातग्रस्त कारमधील एकूण पाच जणांपैकी दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांना तात्काळ ग्रामीण रुग्णालय महाबळेश्वर येथे उपचारासाठी हलवण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे. या मोहिमेत अजित जाधव, आशिष बिरामणे, अनिकेत वागदरे, संकेत सावंत, ऋषिकेश जाधव, साई हवलदार, विक्रांत जाधव, सुनील बाबा भाटिया, सुजित कोळी, अमीत कोळी, अनिल केळगणे तसेच इतर सहकारी मित्रांनी विशेष मेहनत घेतली.

आंबेनळी घाटामध्ये सुरेंद्र इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी या ठेकेदार कंपनीमार्फत घाटरस्त्याच्या रूंदीकरणाचे काम सुरू करण्यात आले असून आधीचा घाटरस्ता अतिशय दूर्दशा झालेला दिसून येत आहे. महाराष्ट्र स्टेट इंन्फ्रास्ट्रक्चरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनमार्फत ठेकेदाराच्या कामादरम्यान घाटरस्ता धोकादायक होण्याबाबत कोणत्याही प्रकारे गांभीर्याने लक्ष पुरविण्यात आले नसल्याने घाटात अपघाताचे प्रमाण वाढून जीवघेण्या अपघातांनाही निमंत्रण मिळण्याची शक्यता आहे.



## Change of Name

I, AATHIRA RAMANATHAN, w/o Sunuraj Rajgopal Pillai, residing at Flat No. 703, Sector 18, Yash Garden, Kamothe, hereby state that I have changed my name to "AATHIRA SUNURAJ PILLAI" as per Gazette Notification No. M-25190844 dated 3rd September 2025. I further declare that "Aathira Ramanathan" and "Aathira Sunuraj Pillai" refer to one and the same person, that is, myself.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि श्रीमती राजुल प्रकाश ओसवाल आणि श्री. राहुल प्रकाश ओसवाल यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ८३ | ३-१०-०० | १.०१ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्रीमती राजुल प्रकाश ओसवाल आणि श्री. राहुल प्रकाश ओसवाल यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : २८/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

मे.साळवी सो.यांचे कोर्ट
ॲड.राजकुमार व्ही. जाधव
अर्जदाराचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१३४९/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०१/२०२६

कै. आदित दिलीप क्षीरसागर मयताचे वारस
श्रीमती. अमिता दिलीप क्षीरसागर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, सदर अर्जातील अर्जदार ही मयत कै. आदित दिलीप क्षीरसागर यांची आई आहे. कै. आदित दिलीप क्षीरसागर यांचे दिनांक १९/०५/२०२५ रोजी जनरल हॉस्पीटल, वाशी, नवी मुंबई, ठाणे येथे अविवाहीत निधन झाले आहे. तसेच कै. आदित दिलीप क्षिरसागर यांचे वडील कै. दिलीप केशवराव क्षीरसागर यांचे दिनांक ०७/१२/२०२३ रोजी रा. फ्लॅट नं.९०३, वक्रतुंड अपार्टमेन्ट, प्लॉट नं. २१, नावडे फेज २, येथे राहात्या घरी निधन झाले आहे. सदर मृत्यूचा दाखला अर्जदारांनी हया अर्जासोबत दाखल केलेला असुन कै. आदित दिलीप क्षीरसागर यांच्या मृत्यु समयी त्यांच्या स्वकष्टार्जित मालकीची अशी खाली वर्णन केलेली जंगम मिळकत होती.

**मिळकतीचे वर्णन**

PF UAN : 101900524231
PF ACCOUNT NO. : BGBNG20079970000010080
EMPLOYE NAME : ADIT KSHIRSAGAR
AMONT : 44,011/- & (GRATUITY AND INSURANCE AMOUNT)

या वर नमुद मिळकती सबंधात अर्जदार हेच कै. आदित दिलीप क्षीरसागर यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या में. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्रीमती. अमिता दिलीप क्षीरसागर यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. आदित दिलीप क्षीरसागर यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक २४/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

## वाचकांसाठी विनम्र सूचना

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

## जाहीर नोटीस

या नोटीसेव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते कि, आमचे अशिल श्री. अशोक रेवणप्पा गुरव, राहणार- सी - ५/१६/१, सेक्टर-८, तालुका-पनवेल, जिल्हा रायगड यांनी सौ. मानसी बच्यानी राहणार अंधेरी मुंबई यांना खालील वर्णनाचा भुखंड त्रीपक्षीय करारनाम्याव्दारे हस्तातरंण करून देणार आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : द्रोणागीरी नोड, ता. उरण, जि, रायगड**

| मौजे | सेक्टर | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| द्रोणागिरी | ५५ | ७१ | ३९.९६ चौ.मी. |

तरी सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, तसेच वारसाहक्क, हितसंबंध, गहाण, दान, तारण कब्जा, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, मृत्युपत्र. बक्षीसपत्र, विकसन करारनामा, वटणीपत्र अथवा कुलमुख्यतारपत्राद्वारे व मुख्यतार पत्राद्वारे असलेले हितसंबंध तसेच ताबा वहिवाटी याच्या बाबत मालकी हक्काचा शोध घेत आहोत आणि तसा हितसंबंध असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासहित खाली नमुद केलेल्या पत्यावर आपली हरकत कळवावी. विहित मुदतीत अशी कोणतीही योग्य लेखी हरकत पुराव्या सहित न आल्यास सदर मिळकत हि निर्विवाद व बोजाविरहित समजुन माझे अशिल हे १५ दिवसांची मुदत पुर्ण होताच सदर मिळकतीबाबत पुढील त्रीपक्षीय करार सदर जमिनीच्या विद्यमान मालकाबरोबर पुर्ण करण्यात येईल व मुदतीनंतर आलेली हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/१२/२०२५

सही/-
**ॲड.लक्ष्मी एम.काळे (सुर्यवंशी)**
**शॉप नं.०१, मालती अपार्टमेंट, प्लॉट नं.ए ११/२, सेक्टर-२०, वेलकम हॉटेल जवळ,**
**नेरुळ (प), नवी मुंबई-४००७०६**
**मो.नं.९१३७९९९३५८**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे कोन, ता. पनवेल, जि. रायगड येथील मुळ मालक / भोगवटाधारक श्री. महादी आंबो म्हात्रे, बेबी भिकु डुकरे, लाडकी पदू पवार, रंजना विलास भागीत, फशी अमर पटेल, श्री. नारायण पुंडलिक पाटील, विठाबाई देहू पाटील, शकुंतला चंद्रकांत गावडे, श्री. नरेश बाळाराम म्हात्रे, रिना महेश म्हात्रे आणि श्री. किशोर बाळाराम म्हात्रे यांचे हिश्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जिरायत जमीन आमचे अशिलांनी त्यांच्याकडुन कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत.

सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापुर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक / भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरीता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन : मौजे कोन, ता. पनवेल, जि. रायगड**

| खाते क्रमांक | भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं./ गट नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १०४ | महादी आंबो म्हात्रे व इतर | ३९/१/ब | ०-२०-००<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण क्षेत्र ०-२१-०० | ४.३८ |

तरी वर नमुद जमीनीवर / मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासहित खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबतचा जमीन मालक श्री. महादी आंबो म्हात्रे, बेबी भिकु डुकरे, लाडकी पदू पवार, रंजना विलास भागीत, फशी अमर पटेल, श्री. नारायण पुंडलिक पाटील, विठाबाई देहू पाटील, शकुंतला चंद्रकांत गावडे, श्री. नरेश बाळाराम म्हात्रे, रिना महेश म्हात्रे आणि श्री. किशोर बाळाराम म्हात्रे यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहित असल्याबाबत गृहित धरुन त्याप्रमाणे सदरहू मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमीनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडुन दिल्या आहेत. असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २६/१२/२०२५

सही/-
**ॲड. विशाल कोंडिबा व्हनमाने**
**ऑफिस नं. १२०१, वि-टाइम्स स्क्वेअर, भूखंड क्रं. ३, सेक्टर नं. १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**
**मो. नं. ८२८६६५१७४७**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थि श्री. संजय सुभाष ओसवाल यांच्या मालकी वहीवाटीच्या व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहीवाटीतील मौजे नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत त्यांचेकडुन आमचे अशिलांनी मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नांदगांव, ता. सुधागड, जि. रायगड येथिल**

| गट नं. | एकूण हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ५४/१ | ०-६१-०० | ०.१० |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्री. संजय सुभाष ओसवाल यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पाली
दिनांक : २८/१२/२०२५

सही/-
**श्री.नरेश गोविंद शिंदे, ॲडव्होकेट**
**मु. पो. पाली भोईआळी,**
**ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५**
**मोबाईल नं. ०८४८३९९४३४३.**

## PUBLIC NOTICE

PUBLIC NOTICE is hereby given that my client intends to purchase Land bearing Survey No. 21/20/B, admeasuring 0-25-00 H.A.R. Pot-kharaba 0-01-00 total area 0-26-00, lying and being at village Sarde, Taluka Uran, District Raigad in the registration sub-district of Uran, Raigad District (more particularly described in Schedule mentioned hereunder) from Ajit Anant Mhatre, Chagan Yadav Patil, Dnyaneshwar Kashinath Mhatre, Dhaneshwar Kashinath Mhatre, Nayana Jayendra Gawand, Nirmala Kisan Thakur, Pramod Anant Mhatre, Maniram Ramdas Gawand, Manisha Bhavesh Gondhali, Mahindra Kashinath Mhatre, Mansi Paresh Mhatre, Maikavati Krishna Mhatre, Shridhar Yadav Patil, Sunita Kashinath Mhatre, Sangeeta Madhukar Gawand, Sanjana Dnyaneshwar Thakur and Hirachand Yadav Patil and legal heirs of Sumanbai Krishna ji Mhatre and Leelabai Rajaram Patil i.e. Sudhakar Rajaram Patil, Arun Rajaram Patil, Shyam Rajaram Patil, Ahilya Haribhau Patil, Prema Manohar Bhagat, Hemlata Umesh Thakur, Chandrabai Ramchandra Patil, Yashoda Gannath Gawand, Anil Ramkrishna Mhatre and Devendra Arun Mhatre.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

Survey No. 21/20/B, admeasuring 0-25-00 H.A.R. Potkharaba 0-01-00 total area 0-26-00, lying and being at village Sarde, Taluka Uran, District Raigad in the registration sub-district of Uran, Raigad District.

Any person/s, Legal Heirs, firm, company having any claims in, to or over the said Land or any part thereof, either by way of sale, mortgage, lien, gift or otherwise howsoever, should give Notice of such Claim/Objection in writing stating therein the nature of his/her/their Claim/Objection alongwith other particulars sufficient to identify the same as well as documentary evidence, in support thereof and the same must be lodged with the office of the undersigned within 15 days from date of Publication of this Notice failing which it shall be presumed that the said Land to be purchased is free from all encumbrances and the rights and claims or any holder of the claim, if any has been waived and my client shall proceed with the purchase of the said Land without considering any Claim or Objection received after expiry of Notice period as aforesaid.

SD/-
**ANKIT SHARMA**
**ADVOCATE**
**Office No.81, Gautam Complex, Sector -11, C.B.D. Belapur**
**Navi Mumbai, District Thane, Maharashtra, India - 400614.**
**Con.no.+91-9022307027**

### फेक वेबसाईटच्या माध्यमातून तामिळनाडू मधील....

# १८ नागरिकांना फसवणाऱ्या आरोपींना पनवेल तालुका पोलिसांनी तिरुपुर सायबर पोलिसांच्या सहाय्याने केली अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कॉलगर्ल पुरवण्याच्या नावाखाली फेक वेबसाईटच्या माध्यमातून तामिळनाडू परिसरातील १८ नागरिकांची हजारो रुपयांची फसवणूक करणाऱ्या १३ जणांना पनवेल तालुका पोलिसांनी तिरुपुर सायबर पोलिसांच्या साहाय्याने अटक केली आहे.

तामिळनाडू मधील तिरुपुर सायबर पोलीस विभागाकडे काही जणांनी फेक वेबसाईटच्या माध्यमातून आपली फसवणूक झाल्याची तक्रार केली होती. यामध्ये एकूण १८ तक्रारदारांनी ५३ हजार रुपये लुबाडल्याची तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे तिरुपुर सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सय्यद रफिक सिकंदन व महिला उपनिरीक्षक कनक वल्ली व त्यांचे पथक तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेत असताना अशाप्रकारच्या गुन्ह्यासंदर्भात पाँडिचेरी व कोईम्बतूर येथे दोघा जणांना अटक झाली असून ते सध्या पुन्हा ऍक्टिव्ह झाले असल्याची माहिती त्यांना मिळाली.



यानुसार त्यांचा शोध घेतला असताना महाराष्ट्रातील पनवेल मधील इंडियाबुल्स या सोसायटीमध्ये ते वास्तव्यास असल्याचे माहिती मिळाली. त्यांच्या पथकाने पनवेल तालुका पोलीस ठाण्यात येऊन वपोनि गजानन घाडगे यांची भेट घेऊन त्यांना गुन्ह्यातील गांभीर्य सांगून पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या सायबर सेल व गुन्हे प्रकटीकरण कक्षाच्या पथकाला साथीला घेऊन इंडियाबुल्स या सोसायटीमधील मेरी-गोल्ड या इमारतीमधील आठव्या मजल्यावरील एका फ्लॅटमध्ये छापा टाकला असता तामिळनाडू परिसरात वास्तव्यास असलेली १३ जणे येथे एकत्रितपणे राहत असल्याचे आढळून आले. त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात मोबाइलफोन, लॅपटॉप व इतर साहित्य आढळून आल्याने त्यांना ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता या गुन्ह्यातील मुख्य आरोपी प्रदीप याच्या माध्यमातून अश्याप्रकारेचे नियमित लोकांची फसवणूक करत असल्याचे आढळून आले. त्यात दोन मुख्य आरोपीसुद्धा आढळून आल्याने त्यांच्याविरोधात सायबर ऍक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आले. सदर आरोपींना मा न्यायालयाच्या आदेशानुसार तिरुपुर सायबर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

कोट - आपली घरे भाड्याने देताना घरमालकाने जागरूक राहावे. तसेच त्याची नोंद जवळच्या पोलीस ठाण्यात करावी. एजेंटच्या माध्यमातून घरे भाड्याने देताना सुद्धा तो एजंट नोंदणीकृत आहे कि नाही याची खात्री करावी. त्याचप्रमाणे आपल्या शेजारी राहणाऱ्या परिवाराची वागणूक, वर्तणूक व वावर याकडे लक्ष ठेवावे. काही संशयास्पद आढळ्यास नजीकचे पोलीस ठाणे किंवा आपत्कालीन क्र ११२ यांच्यावर संपर्क साधावा. तक्रारदाराचे नाव गुपित ठेवण्यात येते - वपोनि गजानन घाडगे

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत पेण तालुक्यातील युवा कार्यकर्ते मनसेमध्ये जाहीर प्रवेश

**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार तसेच मनसे नेते अमित ठाकरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तरुण व तडफदार रायगड उपजिल्हा अध्यक्ष संदिपदादा ठाकुर यांच्या नेतृत्वाखाली पेण तालुक्यातील तरणखोप येथील समाजसेवक रुपेश म्हात्रे (बुवा) यांनी आपले सहकारी प्रणय म्हात्रे,जयेश म्हात्रे, आदिवासी समाजाचे नेते महादेव ठाकुर यांनी मनसेमध्ये मनसे कार्यालय,पेण विधानसभा रायगड जिल्हा येथे जाहीर प्रवेश केला.

सदर प्रवेशावेळी आत्ता सध्याची राजकीय परिस्थिती पाहता मनसेमध्ये आलेल्या पेण तालुक्यातील समाजसेवक रुपेश म्हात्रे (बुवा) व आदिवासी समाजाचे युवा नेते महादेव ठाकुर यांना वेळोवेळी सामाजिक बांधिलकी जपून पक्षाचे कार्य तळागाळात पोहचवण्यासाठी नक्कीच प्रयत्नशील राहतील असा विश्वास रायगड उपजिल्हा अध्यक्ष संदिपदादा ठाकुर प्रवेशावेळी व्यक्त केला.

सदर पक्ष प्रवेशावेळी रायगड उपजिल्हा अध्यक्ष संदिपदादा ठाकुर यांच्यासोबत महिला पेण तालुका अध्यक्षा गौरी ताई पाटील व्होरा, पेण उपतालुका अध्यक्ष प्रसाद पाटील, नितेश पाटील, विजय पाटील, पंकज पाटील, जिते विभाग अध्यक्ष विवेक घरत, हमरापुर विभाग अध्यक्ष नमस्कार भगत, वाशी विभाग अध्यक्ष सुहास पवार तसेच प्रणय म्हात्रे, आदित्य सुर्वे तथा असंख्य महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.



# श्रीवर्धन समुद्रकिनारा मार्ग व बाजारपेठेत वाहतूक कोंडी

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

काल २५ डिसेंबर नाताळची सुट्टी पडल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती व श्रीवर्धन शहरात तसेच श्रीवर्धन तालुक्यात हरिहरेश्वर, दिवेआगर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची संख्या वाढली आहे. दिवेआगर किंवा हरिहरेश्वर येथे येणारे पर्यटक आवर्जून श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याला भेट देतात. मात्र श्रीवर्धन समुद्रकिनारी पार्किंग साठी जागा उपलब्ध नसल्यामुळे पोलीस प्रशासन देखील हतबल झाले आहे. श्रीवर्धन समुद्रकिनारा मार्गावरती वाहतुक पोलीस नेमून सुद्धा पर्यटक आपल्या गाड्या जबरदस्तीने समुद्रकिनारी घेऊन जात आहेत.



श्रीवर्धन नगरपरिषद शहराच्या प्रवेशद्वारावरती पर्यटकांकडून काही कर म्हणून रक्कम जमा करत असते. मात्र या बदल्यात श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाने पर्यटकांना पार्किंगची सुविधा उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे असताना नगरपरिषद प्रशासनाकडून या गोष्टीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. र.ना. राऊत विद्यालयाच्या पटांगणामध्ये पार्किंगची सुविधा तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध करून दिली होती. मात्र नगर परिषदेकडून मैदान साफ केले जात नसल्यामुळे त्या ठिकाणची स्वच्छता केली जात नसल्यामुळे शाळा प्रशासनाने मैदानाच्या बाजूला चर खोदून मैदानात पार्किंगचे प्रवेश बंद करून टाकले आहेत.

श्रीवर्धन नगर परिषदेला कायमस्वरूपी मुख्याधिकारी नसल्याने सद्यस्थितीत असलेल्या मुख्याधिकाऱ्यांकडे श्रीवर्धन व म्हसळा या दोन्ही ठिकाणचा चार्ज असल्याने मुख्याधिकारी अनेक वेळा फोन रिसीव्ह करत नाहित. अनेक वेळा बातम्या प्रसिद्ध करून सुद्धा श्रीवर्धन येथील अवधूत मंदिराजवळ पर्यटकांकडून जेवण बनवण्याचे प्रकार सुरूच आहेत. जर का हे प्रकार असेच सुरू राहिले तर हिंदुत्ववादी संघटनांकडून त्या ठिकाणी जेवण बनवणाऱ्या पर्यटकांना चोप दिला जाईल. असे हिंदुत्ववादी संघटनांकडून जाहीर करण्यात आले आहे. पार्किंगच्या समस्येबाबत श्रीवर्धनच्या आमदार व महिला बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांच्याजवळ संपर्क साधून सदर प्रश्न मार्गी लावण्याबाबत विनंती करण्यात आली होती. परंतु अद्याप त्यांच्याकडूनही या प्रश्नावरती योग्य असा तोडगा निघालेला नाही. तरी श्रीवर्धनच्या स्थानिक आमदार व महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे व श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाने पार्किंगसाठी सुविधा तातडीने उपलब्ध करून द्यावी अशी मागणी केली जात आहे.

# ग्रामीण कलाकारांना प्रोत्साहन देण्यात मला आनंद वाटतो : महेंद्र घरत

**दै.रायगड नगरी । उरण**

गावो-गावच्या नाट्य मंडळांना, ग्रामीण कलाकारांना प्रोत्साहन देण्यात मला आनंद वाटतो. क्रीडा क्षेत्राबरोबरच गावोगावी नाट्य चळवळ उभी करण्यासाठी मी प्रयत्न करीत राहीन. नाट्य प्रेम हे घरातील तसेच नाट्य रसिकांच्या प्रेमामुळे वाढते. नाटककार हसूराम पाटील, अशोक म्हात्रे, धनेश्वर म्हात्रे या कलाकारांनी ग्रामीण कलाकारांना सोबत घेऊन नाट्यकलेचा जागर मांडला आहे. ही मंडळी करत असलेले काम अत्यंत स्तुत्य असे आहे.

ग्रामीण नाट्य संस्कृती पूर्वीप्रमाणे प्रत्येक गावागावात अभंग रहावी यासाठी मी प्रयत्नरत राहीन. असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनी केले. उरण तालुक्यातील वेशवे येथील रामनाथ मुंबईकर, जयश्री मुंबईकर, मनीष मुंबईकर, प्रज्ञा मुंबईकर,राज्वी मुंबईकर मुंबईकर या परिवाराच्या वतीने आणि अष्टगंध कला मंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे यांच्या संकल्पनेतून व उद्योजक रमेश चिंतामण कोळी यांच्या निर्मितीतून, श्री सत्यनारायणाच्या महापूजे निमित्त हसूराम पाटील लिखित व धनेश्वर म्हात्रे, प्रसाद कडू दिग्दर्शित पैशाने तुटली नाती हा दोन अंकी नाट्यप्रयोग अष्टगंध कला मंचाच्या सादरीकरणातून गुरुवारी (दि.२५) सादर करण्यात आला. त्यावेळी महेंद्रशेठ घरत हे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होते.

याप्रसंगी सरपंच अजित पाटील, माजी सरपंच विलास पाटील, संदीप पाटील, चंद्रकांत मुंबईकर, कृष्णा पाटील, महेंद्र मुंबईकर, सुहास मुंबईकर, विनायक मुंबईकर, विद्याधर मुंबईकर, अरविंद पाटील, विद्याधर म्हात्रे, प्रमोद पाटील, दत्तात्रेय म्हात्रे, आदी मान्यवर उपस्थित होते. आनंद कुबल (मुंबई) यांचे संगीत तर राजा जोशी यांचे नेपथ्य, अमृत म्हात्रे यांची रंगभूषा होती. नाटकात हसूराम पाटील, कृष्णानाथ म्हात्रे, सुमित कुंभार, चेतन



पाटील, रोशन घरत, अशोक म्हात्रे, दिगंबर कोळी, नवनीत माळी, जयकिशन मोकल, अलंकार कडू, वैशाली मोहिते, परेशा सरोदे, निकिता पाटील, शिल्पा काकडे आदी कलाकारांनी आपल्या अभिनयातून भूमिका बजावल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयदास ठाकूर यांनी केले.

### पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५

# स्वीप अंतर्गत लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये मतदार जनजागृती स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या स्वीप उपक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे येथे नुकतेच विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदवून मतदानाबद्दल सकारात्मक संदेश दिला.

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे येथे चित्रकला, निबंध लेखन, पत्र लेखन, वक्तृत्व, रांगोळी आणि पोस्टर मेकिंग या प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी सर्जनशील कल्पनांच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व, जबाबदारी आणि लोकशाही मूल्ये प्रभावीपणे मांडली.

यावेळी मार्गदर्शन करताना शाळेचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी म्हणाले मतदान हा फक्त हक्क नाही, तर भविष्य घडवण्याची संधी आहे. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीची जाणीव निर्माण झाली, तर उद्या ते सजग व जबाबदार मतदार बनतील. या स्पर्धांनी त्यांची सामाजिक जाणीव नक्कीच वाढवली,

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये मतदार जागरूकता, सामाजिक जबाबदारी आणि लोकशाहीबद्दल आदर निर्माण झाल्याचे समन्वयक शिक्षिका रूहल सिंह यांनी सांगितले.यावेळी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# चिंध्रण परिसरामध्ये अनेक विकासकामांना गती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून आणि त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे चिंध्रण परिसरामध्ये अनेक विकासकामांना गती मिळाली आहे. या विविध कामांचा शुभारंभ आणि लोकार्पण सोहळा भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या शुभहस्ते शुक्रवारी उत्साहात पार पडला.



चिंध्रण येथील सारनाथ बुद्धविहार येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतंर्गत ४० लाख रुपये खर्चून उभारण्यात येणारे सभागृह व सुशोभीकरणाचे काम, तसेच आमदार ठाकूर यांच्या २५-१५ निधीतून १० लाख रुपये खर्चाच्या अंतर्गत रस्ता काँक्रिटीकरणाच्या कामाचे भूमिपूजन यावेळी करण्यात आले. याचबरोबर महिला बचत गटाच्या इमारतीचे भूमिपूजन आणि वपल येथे एमएमआरडीएच्या ४० लाख रुपयांच्या निधीतून पालेबुद्रुक मुख्य रस्ता ते गणेशनगर पर्यंतच्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. तसेच लोकार्पण सोहळ्यामध्ये कल्पेश शहा ते गणपती मंदिर या भागातील १३ लाख रुपये खर्चाचे अंतर्गत गटार व काँक्रिटीकरण, कोणार्क बिल्डिंग ते वसंत पाटील यांच्या घरापर्यंतचा रस्ता, आणि जिल्हा परिषद सेस फंडातून १० लाख रुपये खर्चून पूर्ण करण्यात आलेल्या मोतीराम टेंबे ते अप्पा महादेव पाटील यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे लोकार्पण करण्यात आले. तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून बसवण्यात आलेले ३ सोलर हायमास्ट आणि १० सोलर स्ट्रीट लाईट्स देखील जनतेसाठी समर्पित करण्यात आले. या विकासकामांमुळे चिंध्रण परिसरातील नागरिकांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न सुटणार असून ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# रायगड जिल्हास्तरीय शालेय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद रायगड व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड, अलिबाग यांच्या मान्यतेने जिल्हास्तरीय शालेय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा १७ व १९ वर्षातील मुले /मुली यांच्यासाठी अभिनव ज्ञान मंदिर कॉलेज कर्जत येथे जिल्हास्तरीय शालेय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा ही शनिवार दिनांक२१-१०-२०२५ रोजी पार पडली. पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगड ने आयोजित केलेल्या या स्पर्धेला जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड, अभिनव ज्ञानमंदिर यांचे मोलाचे सहकार्य झाले. या स्पर्धेत एकूण २० खेळाडू सहभागी झाले होते.

ही स्पर्धा १७ व १९ वर्षातील मुला मुलींसाठी घेण्यात आली. या स्पर्धेचे पंच.म्हणून आंतरराष्ट्रीय पदक विजेते मास्टर खेळाडू गोपीनाथ पवार (मुंबई), राष्ट्रीय खेळाडू व राज्य पंच सुरेश धुळप (मुंबई) आणि आणि उपनगर मुंबई चे राजेश शिर्के यांनी काम केले. या स्पर्धेचे व्यवस्थापन पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशनचे कार्यकारणी सदस्य संदीप कृष्णा पाटकर यांनी कार्याध्यक्ष यशवंत अंबाजी मोकल यांच्या सूचनेनुसार केले होते. स्पर्धेचे आयोजन यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग, वेटलिफ्टिंग, कुस्ती खेळाडू हनुमंत खरात सर आणि अभिनव कॉलेजचे नवनाथ दाभाडे सर यांनी केले. स्पर्धेचे उद्घाटन व्ही बी शिंदे सर (मुख्याध्यापक) यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे कार्याध्यक्ष यशवंत मोकल, सदस्य संदीप पाटकर, आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त खेळाडू गणेश तोटे, राष्ट्रीय शरीरसौष्ठवपटू सुरेश गीद, कॉलेजचे जेष्ठ शिक्षक श्री. मोरे सर उपस्थित होते. या स्पर्धेच्या बक्षीस समारंभाला कॉलेजचे सचिव श्री मणियार सर, हरिश्चंद्र मांडे(उपाध्यक्ष रायगड जिल्हा किसान मोर्चा)हे मान्यवर उपस्थित होते. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या स्पर्धेत मुलांच्या १७वर्षा आतील स्पर्धेत राज कडू (ऑर्चिड ग्लोबल स्कूल, कर्जत) हा स्ट्राँग बॉय झाला.

तर मुलींमध्ये जिज्ञासा बडेकर ( . अभिनव ज्ञानमंदिर ज्यु. कॉलेज) ही स्ट्राँग गर्ल झाली. तर १९ वर्षातील मुलांच्या स्पर्धेत हर्षल घरत(अभिनव ज्ञानमंदिर ज्युनि. कॉलेज कर्जत) आणि मुलींमध्ये आचल राजभर (अभिनव ज्ञानमंदिर ज्युनि. कॉलेज कर्जत) विजेती झाली.